
# मैत्रीचा आनंदमेळावा

आपला मैत्री गट मेळघाटचा मित्र म्हणुन गेल्या पंचवीस वर्षापासून मेळघाटमध्ये काम करतो. गरोदर माता आणि त्यांच्या मुलांचे आरोग्य, जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मुलांसाठी पुरक शिक्षणाची ओळख करून देणे, मोठ्या मुलांसाठी 'विज्ञान प्रकल्प स्पर्धा' सारखे अनेक उपक्रम सातत्याने करत असतात.

यापैकीच दरवर्षी न चुकता होणारा मैत्रीचा 'आनंदमेळावा' छोट्या गावातील ३ ते ४ वर्षाच्या मुलांपासून ते पुर्वी ८ वीच्या मुलांपर्यन्त, जिल्हा परिषद शाळेतील मुलं, मुली ह्या आनंदमेळाव्यात सहभागी होत असतात.

चार दिवसांचा मेळावा पण याची तयारी मात्र चार-पाच महिने आधीपासूनच अश्विनी धर्माधिकारी आणि तिच्या बरोबरचे इतर सहकारी इथे पुण्यात करत असतात. पुण्याहून येणा-या स्वयंसेवकांचे प्रशिक्षण म्हणजे मुलांना सहज करता येतील अश्या कृति चित्रकला, हस्तकला, गाणी, गोष्टी पुण्याहून येणाऱ्या स्वयंसेवकांना शिकवण्याचे काम केले जाते.




अश्विनी बरोबर २६ नोव्हेंबरला पुण्याहुन स्वयंसेवकांची टीम निघाली आणि ते सर्व २७ नोव्हें संध्याकाळी चिलाटी मुक्कामी पोहचले

PAGE No.
DATE

२८ नोव्हेंबर – गावमित्र प्रशिक्षण

चिलारी सिमोरी करंजखेडा इथून आलेले गावमित्र आणि पुण्यातुन आलेले स्वयंसेवक यांचे मिळून एक दिवसाचे प्रशिक्षण घेण्यात येते, पुढच्या चार दिवसात आनंदमेळाव्यात मुलांना कोणता कलाकृती शिकवायच्या हे गावमित्रांकडून करून घेण्यात येते एकुणच मेळावा कश्या पद्धतीने घ्यायचा याचा आराखडा गावमित्रां बरोबर ठरवला जातो

[गावमित्र – हे वर्षभर जिल्हा परिषदेच्या शाळेत जावून दोन तास मुलांना अभ्यासाला पूरक अश्या कलाकृती घेत असतात त्याचे प्रशिक्षण मैत्री गट त्यांना वेळोवेळी देत असतो]




चिलारी आणि सुमिता अश्या दोन ठिकाणी मुलांसाठी 'आनंदमेळावा' घेतला जातो. छोट्या मुलांचे प्रत्येक गटात १५ ते 20 मुलं असे तीन गट व मोठ्या मुलांचे १५ ते 20 मुले असे 3 गट अश्या पद्धतीने प्रत्येक गटात १ गावमित्र व १ स्वयंसेवक असे दोघं मिळुन एक गट सांभाळतात. प्रत्येक गटाला गाजर, कांदा, मुळा अश्या फळ भाज्यांच्या नावाचे बिल्ले दिले होते ओळखण्यास सोपे जाते. आपल्या गटात बसण्याची शिस्त मुलांना कळते

चिलारी मोठा व छोटा विभाग, करंजखेडा येथून मुलांना

तिथले स्थानिक स्वयंसेवक जीप गाडीने चिमारी आणि सुमिला मध्ये घेऊन येतात आणि संध्याकाळी परत त्यांच्या गावात नेऊन सोडतात

बुधवार २९ नोव्हेंबर 2023 शिबीराचा पहिला दिवस

९:30 ते १०:०० – प्रार्थना, योगासने आणि नाश्ता
नाश्ता करून मुलं आल्यावर त्यांचे गट पाडणे त्यांच्या इयत्ता प्रमाणे, बिल्ले वाटणे नंतर त्यांची कविता व गाणी म्हणून घेणे




१०:30 ते ११:30 मुलांकडून कागदाची घर बनवून घ्यायची होती. चौकोनी कार्डशीटच्या योग्य पद्धतीने घड्या घालून, कापून, ग्लु स्टीकने चिटकवून घर तयार करायचे होते. दार, खिडक्या आणि घराचे छप्पर स्केच पेन ने रंगवायचे होते.
घडीकाम, चिटकवणे, कापणे आणि रंगवणे ह्याचा अनुभव घेता येणार होता. मुलांना कात्री आणि ग्लुस्टिक चे विशेष आकर्षण होते. घर बनवून आल्यावर

खुपच आनंद आला होता.



१२:०० ते १:०० आईसस्क्रीम काड्यांचा डबा बनवणे
ही कृती करायची होती. डबा बनवताना फेविकॉल
वापरणे आणि काड्यांची एकावर एक रचना करताना
त्यांना गम्मत येत होती. तसेच त्या आईस्क्रीम च्या
काड्या वापरून बनवलेल्या ~~डब~~ डब्यामध्ये पेन्सिल
पट्टी, खोडरबर ठेवता येणार होतो.

१:०० ते 2:30 मुलांचे आणि स्वयंसेवकांचे जेवण
मुलांचे जेवण झाल्यावर मुले पुस्तके पहाण्यात
रमुन गेली होती.
2:30 ते 3: मुलांना चित्र रंगवायला दिली (क्रेयॉनने रंगवणे)
3:00 ते ४:०० गोष्टी वाचुन दाखवणे आणि त्याच गोष्टींमधुन
नाटक व पेपर शो ची तयारी करून घेणे
४:30 वाजता मुलांना खाऊ देऊन घरी पाठवले.

PAGE No. DATE

## गुरुवार ३० नोव्हेंबर २०२३ – दुसरा दिवस

पहिल्या दिवशीच्या उत्साहाने मुलं दुसऱ्या दिवशी आली. पहिल्या दिवसापेक्षा दुसऱ्या दिवशी मुलांच्या संख्येत वाढ झाली होती आणि गावमित्र आणि स्वयंसेवक संख्येने कमी पडत होते

९:३० ते १०:३० प्रार्थना योगासने नाश्ता

गटात बसणे बिल्ले लावणे, गाणी शिकवणे

मुलं येतील तसे शिकवून झाले. Hidden Picture book मधून चित्रे शोधणे सावरून मुलांना प्रश्न विचारणे, मुलांकडून प्रश्न तयार करून घेणे अशा प्रकारच्या Activites घेतल्या नंतर पुस्तक बघुन गोष्टी तयार करणे हे झाले.

१:३० ते २:३० मुलांचे आणि स्वयंसेवकांचे जेवण

३:०० ते ४:०० रेशमी फितीचे गुलाबाचे फूल तयार करायला मुलांना दिले सुरवातीला अवघड वाटणारे काम फुलाचा आकार तयार झाल्यावर सोपे झाले मुलींनी गुलाबाचे फूल हेअर बॅन्ड करून घातले काहींनी अंगठीसारखे बोटात घरले

नंतर गोष्टी वाचन आणि नाटकाची तालीम झाली.

४:०० ते ४:३० खाऊ खाणे व घरी जाणे.



शुक्रवार १ डिसेंबर 2023 तिसरा दिवस

आज सुरुवातीची प्रार्थना योगासने नाश्ता, खिळे लावणे झाल्यावर

१०:३० ते ११:३० लोकरीच्या फुलांचा हार करायचा होता छोट्या गटातील मुलांना जरा अवघड काम होते तरी ~~[illegible]~~ उत्सुकतेने मुलांनी तो केला. लोकर वहीला १२, ६, १२ अशा पद्धतीने गुंडाळायची होती मोजणे आणि लक्षपूर्वक गुंडाळणे ह्या दोन्ही गोष्टी मुलांनी छान केल्या, गाठी मारणे आणि लोकर कापणे इथे मुलांना मदत लागली पण हार पूर्ण झाल्यावर तो डोक्यावर मुकुटासारखा ठेवून काही मुलं गळ्यात घालून फिरत होते.




११:३० ते १:३० एक छोटे पुस्तक घडी करून ते वाचायचे होते ह्या पुस्तकाची घडी घालताना उलट अंक मोजून घडी घालत पुस्तक तयार करायचे होते, उद्देश हा होता की तशीच छोटीशी गोष्ट तयार करून योग्य त्या ठिकाणी कापून नंतर मुलांनी तशी पुस्तक स्वतः तयार करावीत.

हया नंतरची कृती मोठ्या चित्रामध्ये कोलाज करणे. फळांचे, चांदणी, फुलपाखरांचे आकार एका कागदावर काढले होते. त्यावर मुलांनी डिंक लावून घोटीव कागदाचे तुकडे हाताने फाडून चिटकवायचे होते व चित्र पूर्ण करायचे. मुलांना ही कृती खूप आवडली सगळ्यांनी जास्त मदत न घेता ही कृती पूर्ण केली. त्याच चित्राबद्दल काही वाक्य रिकाम्या जागेत लिहायची होती.

१:३० ते 2:30 जेवण आणि पुस्तक वाचणे

3:00 ते ४:०० मुलांनी स्वतःच्या रंगांनी ग्रिटिंग तयार केले, मोठ्या मुलांनी कागदाचे आकार कापून ते चिटकवले व ग्रिटिंग तयार केले.

आनंदमेळाव्यात शेवटच्या दिवशी सगळी मुलं नाटक सादर करतात त्याची तयारी त्यांना गोष्टी वाचून दाखवणे व संवाद म्हणून घेणे हे रोज शेवटी केले जात होते

४:०० ते ४:३० खाऊ खाऊन घरी जाण्याची वेळ.



शनिवार 2 डिसेंबर 2023

आज 'आनंदमेळावा' चा शेवटचा दिवस होता. रोज युनिफॉर्म मध्ये येणारी मुलं रंगीबेरंगी कपडे घालुन, छान तयार होवुन आली होती, कारण आज नाटक सादर करायचे होते.

सकाळचा नाश्ता, प्रार्थना, गाणी, झाल्यावर मुलं आपल्या गटात बसली.

आजची कृती ही मोठ्या कार्डशीटवर (cut & paste books) मधून चित्र कापून विषयानुसार कागदावर चिटकवायची होती. मुलांना विषय दिले होते बाजार, जत्रा, कुटुंब, जंगल, मुलांना जो विषय आवडला जी चित्र आवडली ती पुस्तकातुन कापून मोठ्या कार्डशिटवर चिटकवली. छोट्या मुलांना विषयाप्रमाणे नीट नाही करता आले पण मोठ्या इयत्तेच्या मुलांनी फार सुंदर सा चित्रांचा वापर करून एक मोठे चित्र तयार केले ही कृती चार मुलांमध्ये मिळुन करायची होती. ह्यामुळे गटकामाचा आनंद मुलांनी घेतला.

आज जेवणानंतर पुर्णवेळ नाटकाची तयारी करायची होती. सगळे ताई, दादा आणि मुलं आपला नाटक कसं करायचं ह्याच्या सरावात गुंतले होते. नाटकासाठी लागणारी ड्रेपरी, चित्र मुलांची निवड, संवाद ह्या सगळ्याचा ताळ मेळ बसल्यावर नाटक सादर करण्याची वेळ आली. मोठ्या मुलांनी स्वतः संवाद म्हणून नाटक सादर केले



१ छोट्यांच्या लाहि - दादांनी मुलांना घेवून नाटक सादर केले एकूणच सगळ्यांची मज्जा चालू होती, त्यातच पावसाने हजेरी लावली.



ह्या वर्षी शिबीर सुरू झाल्यापासून रोज पाऊस पडत होता त्यामुळे जास्तच तारांबळ उडत होती सगळ्यांची दमछाक होत होती तरी सुद्धा सगळ्यांनी आपापली काम चोख बजावली आणि आनंदमेळाव्याची बुंदीचा लाडू, चिक्की आणि चिवडा असा खाऊ सगळ्या मुलांना वाटून गोड सांगता झाली.

प्रत्येक मुलाला घरी जाताना खाऊ बरोबरच एका पिशवीत १ वही, १ पेन्सिल, खोडरबर, क्रेऑन बॉक्स, पट्टी, पॅड आणि त्यांनी केलेल्या सगळ्या वस्तु असं एका पिशवीत भरून दिलं होतं ह्या सगळ्या गोष्टींचे मुलांना खुप अप्रुप होते

अश्या पद्धतीने तऱ्हेतऱ्हेच्या वस्तु शिकुन खुप सगळ्या आठवणी घेवुन मुलं आपापल्या घरी निघुन गेली. आणि आनंदमेळाव्याची सांगता झाली.

PAGE No.
DATE



आनंद मेळावा स्वतःच आनंदी करण्यात ह्यांचा सहभाग — रामकली आणि सोच्या मदतनीस

मुलं आणि स्वयंसेवक मिळून १५० - (७)जणांचा रूचकर स्वयंपाक करून वाढणाऱ्या ह्या अन्नपूर्णा ह्यांची आठवण तर महत्वाचीच



मेळघाट मध्ये बोलीभाषा कोरकू असली तरी हिंदी भाषा जास्त बोलली जाते, मुलांशी संवादाची भाषा हिंदी होती शिक्षणाचं माध्यम मराठी होते, अशा परिस्थितीत मुलांशी संवाद साधायचा होता.

आनंदमेळाव्यात येण्याचा माझा हा पहिलाच अनुभव होता, मला जो काम जमल ते 100% करायचे तिथे जाताना मला कोणत्याच गोष्टीचा फार अनुभव नव्हता माझी पाटी कोरी होती पण तिथून येताना मात्र मी अनुभवाची शिदोरी सोबत घेवून आले